महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकाकडून चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थाना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक म्हणून दर्जाची मान्यता देण्यासाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती विहीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :अविवि-२०१०/प्र.क्र.५९/१०/कार्या-५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१०.

संदर्भ:- शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/का.-१, दि.४ जुलै,२००८.

**परिपत्रक :-** संदर्भाधीन शासन निर्णयातील परि.(५),४,५,६ व ७ अन्वये अल्पसंख्याक दर्जा प्राप्त अनुदानित/विना-अनुदानित शैक्षणिक संस्थाच्या/महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमाकरीता मंजूर जागांमधील अनुक्रमे ५०%/५१ % जागांवर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशाबाबतच्या तरतूदी नमूद केल्या आहेत. त्याचप्रमाणे या शासन निर्णयातील परि.(५) ४ अन्वये दर्जाप्राप्त शैक्षणिक संस्थाचे (अ) विनाअनुदानित संस्था आणि विनाअनुदानित व अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था ज्यांचे माध्यम मान्यताप्राप्त अल्पसंख्याक भाषा आहे अशा संस्था, तसेच (ब) अनुदानित संस्थाच्या बाबतीत (ज्यांचे शैक्षणिक माध्यम मान्यताप्राप्त अल्पसंख्याक भाषा आहे अशा अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था वगळून) अशा संस्था, असे वर्गीकरण करण्यात आले आहे. या (अ) व (ब) प्रकारच्या बहुतांशी दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थानी सन २००८-०९ तसेच २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये उक्त शासन निर्णयातील परि.(५),४,५,६ व ७ मधील तरतुदींनुसार प्रवेशप्रकिया न राबविता अल्पसंख्याक कोटयातील जागांवर बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असल्याचे शासनास आढळून आले आहे. संदर्भाधीन शासन निर्णयातील परि.(५), ४, ५, ६ व ७ येथील तरतुदीचे काटेकोरपणे पालन व्हावे व त्यानुसार वरील (अ) व (ब) प्रकारच्या दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थामधील अनुक्रमे ५०%/५१% कोटयातील जागांवर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे सुलभ व्हावे याकरिता पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

(i) शासन निर्णय, दि.४जुलै,२००८ मधील परिच्छेद (५) मधील ४,५, ६ व ७ येथील विहीत तरतुदींनुसार अल्पसंख्याक दर्जाप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थानी विविध अभ्यासक्रमाकरिता मंजूर जागांमधील अनुक्रमे ५०% व ५१% जागांवर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी,

(ii) विविध अभ्यासक्रमाकरिता अल्पसंख्याक कोटयातील उपलब्ध सर्व जागा (५०% वा ५१% जागा) नियमानुसार भरण्यासाठी तीन वेगवेगळया स्थानिक व सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रात (यामध्ये संबंधित शैक्षणिक संस्थेस ज्या भाषिक प्रयोजनासाठी अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यात आला आहे त्या संबंधित भाषिक वर्तमानपत्रासह) ठळकपणे दिसू शकेल अशा ठिकाणी किमान तीन-तीन वेळा जाहिरात/ प्रसिध्दी देणे आवश्यक राहील.

(iii) ही जाहिरात/प्रसिध्दी अशासकीय संघटनेमार्फत एकत्रितपणे न देता ती प्रत्येक संस्थेने/ महाविद्यालयाने स्वतंत्रपणे देणे आवश्यक राहील. या जाहिरातीमध्ये संस्थेचे/ महाविद्यालयाचे पूर्ण नाव-पत्ता, शैक्षणिक वर्ष, शाखा/अभ्यासक्रमाचे नावं, अल्पसंख्याक कोटयात भरावयाच्या एकूण जागा, प्रवेश अर्ज मिळण्याची व प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत, संस्थेच्या संकेतस्थळाचा पत्ता इ. बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक राहील.

(iv) अल्पसंख्याक कोट्यातील उपलब्ध जागांवर जर ५०%/५१% इतके अल्पसंख्याक विद्यार्थी उपलब्ध होऊ शकले नाहीत तर दर्जाप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थानी या जागा गुणवत्तेवर आधारित प्रक्रियेद्वारे बिगरअल्पसंख्याक उमेदवारांमधून भरण्याकरिता अल्पसंख्याक विकास विभागाची विनिर्दिष्ट पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. यासाठी दर्जाप्राप्त अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थानी आपला परिपूर्ण प्रस्ताव संबंधित शैक्षणिक वर्षातील त्या-त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेच्या अंतिम दिनांकापासून ६० दिवसांच्या आत मान्यतेसाठी या विभागास पाठविणे आवश्यक राहील.

(v) अल्पसंख्याक दर्जाप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित शैक्षणिक संस्थानी सलग तीन शैक्षणिक वर्षे विविध अभ्यासक्रमाकरिता अल्पसंख्याक कोटयात उपलब्ध अनुक्रमे ५०%/५१% जागा पूर्णपणे भरल्या नाहीत तर संदर्भाधीन शासन निर्णयातील परि.८ (ii) व (iii) येथील तरतुदीतंर्गत अशा शैक्षणिक संस्थाचा अल्पसंख्याक दर्जा मागे घेण्याबाबत उचित कार्यवाही प्रस्ताविण्यात येईल.

२. सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून अल्पसंख्याक दर्जाप्राप्त सर्व अनुदानित/ विना-अनुदानित शैक्षणिक संस्थानी वरील (i) ते (v) येथील मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

( एस.एस.काद्री )
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

महत्वाचे

प्रा.क्र. तांशि/विकेला/तांशा/1255
दिनांक :- 10 JUL 2010

प्रति,
प्राचार्य,
अल्पसंख्याक दर्जाप्राप्त
पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग.

त्यांना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासनाच्या सदर अल्पसंख्याक विभागाच्या शासन परिपत्रकाचे अवलोकन करून त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष - 2010-11 मधील प्रवेश प्रक्रिये बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक